निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २२७ वा.
सोमवार :२० ऑक्टोबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

श्रध्दा एनर्जी ॲन्ड इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि

मॉ.बागेश्वरी साखर कारखाना

वरफळ ता.परतूर जि.जालना

दीपावली

च्या सर्व ऊस उत्पादक शेतकरी ,
कर्मचारी,ऊसतोड कामगार व सर्व जनतेस
हार्दिक हार्दिक शुभेच्छा


श्री.अजय शिवाजीराव जाधव
संचालक


श्री. अमित शिवाजीराव जाधव
कार्याकारी संचालक


श्री. शिवाजीराव भगवानराव जाधव
चेअरमन

मॉ.बागेश्वरी साखर कारखाना

वरफळ ता.परतूर जि.जालना

## 'महाज्योती'च्या माध्यमातून होतकरू विद्यार्थ्यांचे स्वप्न साकार करू - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर /प्रतिनिधी**/महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीचे अनेक वर्षांपासूनचे स्वप्न आज आकारास आले आहे. येत्या काळात ही प्रशासकीय इमारत आधुनिक आणि विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधायुक्त ठरणार आहे. आपण इतर मागासवर्ग विभागाची स्थापना केल्यामुळे गती मिळाली. या विभागाच्या माध्यमातून होतकरू नवीन पिढी आकारास येईल तसेच त्यांच्या स्वप्नांना बळ मिळून गगनभरारी घेता येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

**'महाज्योती'च्या प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन**

सदर येथील जिल्हा नियोजन भवन आवारात महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, वित्त व नियोजन राज्य मंत्री ड. आशिष जयस्वाल, गृह राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार सर्वश्री प्रवीण दटके, परिणय फुके, कृष्णा खोपडे, विकास ठाकरे, चरणसिंग ठाकूर, आशिष देशमुख, संजय मेश्राम, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, ओबीसी समाजाला पुढे नेण्यासाठी विविध योजना सुरू केल्या आहेत. यात प्रशिक्षण, स्वयंरोजगार यांचा समावेश आहे. ओबीसी समाजातील मुलांच्या उज्वल भविष्यासाठी महाज्योतीची निर्मिती केली असून याला पुरेसा निधी उपलब्ध केला आहे. आज ओबीसी मुलासाठी ६० पेक्षा जास्त वसतिगृह सुरू करण्यात आली आहेत. महाज्योतीतून प्रशिक्षण घेऊन मुले विविध स्पर्धा परिक्षेत यश संपादन करीत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. ओबीसी समाजाची नॉन क्रिमिलिअर मर्यादा आपण आठ लाखांपर्यंत नेली आहे. ओबीसी समाजाच्या कल्याणसाठी शासन तत्पर असल्याचे ते म्हणाले.

शैक्षणिक प्रगतीचा पाया घालणारा क्षण – पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाज्योती संस्थेच्या स्वतंत्र इमारतीची पायाभरणी आज झाली आहे. हा ऐतिहासिक क्षण आहे. नागपूरच्या भूमीवर आता 'महाज्योती'ची भव्य ७ मजली प्रशासकीय इमारत तयार होणार आहे. हा केवळ वास्तूचा नव्हे तर शैक्षणिक प्रगतीचा पाया घालणारा क्षण असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

ही प्रशासकीय इमारत शिक्षणासह संस्कार आणि संशोधनासाठी आदर्श मापदंड ठरेल – मंत्री अतुल सावे

नागपूर येथील महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीत वाचनालय, समुपदेशन कक्ष, प्रशिक्षण कक्ष, भोजन कक्ष आणि २४८ विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय अशा सर्व सुविधांचा समावेश असणार आहे. ही वास्तू म्हणजे शिक्षण, संस्कार आणि संशोधनाचा पवित्र संगम राहणार आहे. नाशिक येथे देखील महाज्योती संस्थेचे प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी १७४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचे मंत्री सावे यावेळी म्हणाले.

महाज्योती संस्थेतून प्रशिक्षण घेऊन यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रातिनिधिक सत्कार व महाज्योतीच्या यशोगाथा पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आला. तसेच सात मजली प्रशासकीय इमारत बांधकामाची चित्रफीत दाखविण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी केले. आभार मुख्य लेखा अधिकारी प्रशांत वावगे यांनी मानले. तर सूत्रसंचालन दिनेश मासोडकर यांनी केले.







## मतचोरी होत असल्याचा मला अनुभव, राज ठाकरेंच्या भूमिकेशी महादेव जानकर सहमत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** देशात मतचोरी होत आहे याचा मला अनुभव आहे. त्यामुळे राज ठाकरेंच्या भूमिकेशी मी सहमत असल्याचे मत राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख महादेव जानकर यांनी व्यक्त केले. शेतीप्रधान देशात शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होत नसतील तर शेतकऱ्यांनी संपावर जावं असेही जानकर म्हणाले. महादेव जानकर आज बुलढाण्यात बोलत होते. यावेळी त्यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केल्याचं पाहायला मिळालं. मत चोरी आणि बोगस मतदार मुद्द्यावर ते चांगलेत संतापले होते.राज्यात आणि देशात मत चोरी होत असल्याचा विरोधकांचा आरोप हा सत्य आहे. त्याच्याशी मी सहमत आहे. मला स्वतःला मत चोरीचा अनुभव आला असून याबाबत निवडणूक आयोग स्वायत्त संस्था असूनही गप्प का? असा सवाल महादेव जानकर यांनी उपस्थित केला आहे. मत चोरी आणि बोगस मतदार याबाबतीत राज ठाकरेंच्या भूमिकेशी मी सहमत आहे तर कृषीप्रधान देशात जर शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य होत नसतील तर शेतकऱ्यांनी संपावर जावं असा आवाहनही त्यांनी शेतकऱ्यांना केलं आहे. कर्जमाफीच्या मुद्यावरुन राज्यातील शेतकरी आक्रमक होताना दिसत आहेत. तसेच अतिवृष्टी आणि पुरामुळं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरकारनं दिलेली मदत ही तोकडी असल्याचं मत शेतकऱ्यांनी व्यक्त केलं आहे. याच मुद्यावरुन विरोधकांनी देखील सरकारवर टीका केली आहे.

पंकजा मुंडे या जरी माझ्या बहिणी असतील मात्र त्यांचा पक्ष आणि माझा पक्ष वेगळा आहे. आमचं राजकारणाच्या पलीकडचे वेगळं नातं आहे. त्यामुळं पुनर्वसनासाठी प्रयत्न करण्याचा प्रश्नच येत नाही असंही महादेव जानकर म्हणाले. निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील मतदार यादीत नव्याने ९६ लाख बोगस मतदार घुसवले आहेत, असा खळबळजनक आरोप मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी केला. मला असं कळालं की, १ जुलैला निवडणूक आयोगाने मतदारांची यादी बंद केली. त्यानंतर महाराष्ट्रात मतदारांच्या यादीत ९६ लाख खोटे मतदार भरले आहेत, अशी माहिती मला खात्रीलायक सूत्रांनी दिल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. दरम्यान, राज ठाकरे यांच्या या भूमिकेचं महादेव जानकर यांनी समर्थन केलं आहे. राज ठाकरेंच्या भूमिकेशी मी सहमत असल्याचे जानकर म्हणाले. मतचोरी होत असल्याचा मला अनुभवअसल्याचेही जानकर म्हणाले.

# उजळलेली घरं, पण अंधारलेलं मन !

भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सण ही केवळ धार्मिक प्रथा नसून, ती समाजाच्या चेतनेचे प्रतिबिंब असते. दिवाळी हे त्या सर्व सणांमधले सर्वाधिक लोकप्रिय, सर्वाधिक प्रतीकात्मक आणि सर्वाधिक अर्थपूर्ण पर्व आहे. परंतु आजच्या काळात हा सण आर्थिक उपभोगवादाचा आणि सांस्कृतिक आडमुठेपणाचा उत्सव बनू लागला आहे. फटाक्यांचा आवाज वाढतोय, पण संवाद कमी होतोय; घरं उजळतात, पण माणसं मात्र अधिक एकाकी होत आहेत. या विरोधाभासावर विचार करणे आज आवश्यक आहे. दिवाळीचा मुळ अर्थ आहे. अंधःकारावर प्रकाशाचा विजय. अंधार म्हणजे अज्ञान, अन्याय, भ्रष्टाचार, असमानता आणि द्वेष; तर प्रकाश म्हणजे ज्ञान, न्याय, करुणा, आणि विवेक. आपल्या समाजात आज हे दोन्ही घटक पुन्हा एकदा आमनेसामने उभे आहेत. आपण डिजिटल युगात पोहाचलो आहोत, पण विचारांच्या अंधारातून अजून बाहेर आलो नाही. भ्रष्टाचाराच्या धुरात सत्य हरवतंय, आणि धर्माच्या नावाखाली द्वेषाचा फटाका फोडला जातोय. अशा वेळी दिवाळी आपल्याला आठवण करून देते. खरा प्रकाश म्हणजे विवेकाचा प्रकाश.

दिवाळीच्या दिवसांत बाजारपेठा उजळतात, पण त्याच वेळी समाजातील लाखो हात रिकामे राहतात. एका बाजूला जाहिरातींनी, ऑफर्सनी आणि विलासात जगणाऱ्या वर्गाची दिवाळी होते; तर दुसऱ्या बाजूला रोजंदारी गमावलेल्या, शेतकरी संकटात सापडलेल्या, आणि बेरोजगारीच्या अंधारात जगणाऱ्यांची दिवाळी निःशब्द असते. प्रकाशाचा हा असमतोल आपल्याला समाजातील आर्थिक अन्यायाची जाणीव करून देतो. खरं तर, दिवाळीचा सण आपल्याला सामाजिक समतेचा प्रकाश पसरवण्याची प्रेरणा द्यायला हवा. पण आज हा प्रकाश काहींच्या घरातच साठला आहे. आजचा भारत आर्थिक, तांत्रिक आणि राजकीयदृष्ट्या पुढे गेला असला तरी लोकशाहीचा दीप मंदावलेला जाणवतो. राजकारणात विचारांचा अंधार आणि मतांच्या विक्रीचा बाजार उजळलेला दिसतो. संविधानाच्या मूल्यांना दुय्यम स्थान देत असताना दिवाळीचा सत्याच्या विजयाचा संदेश अधिक अर्थपूर्ण वाटतो. आपण साजरे करतोय स्वातंत्र्याच्या प्रकाशातला सण, पण स्वातंत्र्याच्या मूल्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होतंय. म्हणून दिवाळी आज फक्त उत्सव नाही; ती लोकशाहीतील विवेकाची चाचणी आहे.

दिवाळी म्हणजे फक्त भौतिक सुखाचा उत्सव नव्हे, तर तो संस्कृतीच्या सातत्याचा आणि नवतेच्या मिलाफाचा क्षण आहे. आज आपण पश्चिमेकडील उपभोग संस्कृतीचं अंधानुकरण करताना पारंपरिक मूल्यांना विसरतोय. दिवाळीचा मूळ हेतू 'आनंद वाटणं' हा होता, 'दाखवणं'नव्हे. आपल्या सणांच्या आत्म्याला परत मिळवणं हे आजचं सर्वात मोठं आव्हान आहे. आपल्या संस्कृतीचा आत्मा सहभाजनात आहे, स्पर्धेत नाही. दिवाळीच्या दिव्यांचा प्रकाश काही दिवस टिकतो; पण विचारांचा प्रकाश टिकवला, तर संपूर्ण समाज उजळतो.

# येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित दादा गट) पूर्ण ताकतीने लढवणार - अरविंदराव चव्हाण

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतुर/ प्रतिनिधी**/ वाटुर येथे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने परतूर मंठा नेर शेवली मतदार संघात आढावा बैठक संपन्न. परतुर मतदार संघात माजी आमदार सुरेश जेथलिया राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आल्याने पक्ष मजबूत झालेला आहे. आपला पक्ष हा स्वबळावर देखील या मतदारसंघात निवडणूक लढवण्यास सक्षम असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळेस केले. दादांना भविष्यात मुख्यमंत्री करण्यासाठी, त्यांचे हात मजबूत करण्यासाठी जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन त्यांनी उपस्थित असलेल्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले.माजी आमदार सुरेश जेथलिया यांनी आपल्या मनोगतात म्हणाले की, सत्ता असो वा नसो कार्यकर्ते कधीही मला सोडून गेले नाहीत. या निवडणुका कार्यकर्त्यांच्या असल्याने त्यांच्यासाठी पूर्ण ताकतीने रिंगणात उतरणार असून जास्तीत जास्त जि.प.सदस्य व पं. स. सदस्य निवडून आणणार. व तसेच परतूर नगरपालिकेत देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवणार असा आत्मविश्वास त्यांनी पक्षश्रेष्ठींना दिले.पक्षाचे उपाध्यक्ष मधुकर राजे आर्दड यांनी आपल्या मनोगतात म्हणाले की अजित दादा हे अतिशय शिस्तप्रिय नेते असून सर्व स्तरातील जनतेचा विश्वास अजितदादा यांच्या नेतृत्वावर आहे. या कारणास्तव मी देखील निवृत्त झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निवडला व अनेक निवृत्त सनदी अधिकारी पक्षात येणार आहेत असेही यावेळी त्यांनी सांगितले.जनतेने तुम्हाला निवडणूक लढवण्यासाठी आग्रह केला पाहिजे. अशी प्रतिमा सामान्य जनतेत बनवा असा कानमंत्र इच्छुक उमेदवारांना दिला.तसेच मा.आ.शिवाजीराव चोथेयांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की जालना जिल्ह्यामध्ये आपला पक्ष कसा बळकट करता येईल याकडे जास्त लक्ष देणे गरजेचे आहे. संघटन मजबूत करण्यावर भर दिला पाहिजे.मी ज्या पक्षात होतो तिथे देखील पक्ष संघटनेचे काम केले, इथे देखील त्याचप्रकारे काम करणार असून आपल्यावर कोणताही अन्याय झाला तर मी तुमच्यासोबत उभा राहील हा शब्द दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अण्णासाहेब खंदारे यांनी केले, तर कार्यकर्त्यांच्या वतीने नितीन जेथलिया यांनी मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित चंद्रकांत कारके,रवींद्रतात्या तौर, बळीरामजी कडपे,लक्ष्मणराव दळवी,जयमंगल जाधव,माऊली सरकटे,शेख मेहमूद,रजाक भाई,खय्युम भाई पठाण, महिला जिल्हाध्यक्ष मंगलाताई पाटील,संतोष ढेंगळे,सतीश वाव्हळ,सविता कांबळे, शंकूतला कदम, यांच्यासह सर्व माजी ज.प./ पं.स. सदस्य व माजी नगरसेवक, सर्व प्रमुख पदाधिकारी,कार्यकर्ते व इच्छुक उमेदवार उपस्थित होते.!

# फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण : आनंदीक्षणातून निसर्गविनाश

भारतीय समाज हा सण-उत्सवप्रिय समाज म्हणून जगात ओळखला जातो. आपल्या संस्कृतीतील प्रत्येक सण हा आनंद, ऐक्य, परंपरा आणि श्रद्धेचे प्रतीक असतो. पण आधुनिक काळात या सणांच्या साजरीकरणात अनेक नव्या प्रथा समाविष्ट झाल्या आहेत, ज्यामुळे निसर्गाच्या आरोग्यावर आणि मानवी जीवनावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यातीलच एक म्हणजे फटाक्यांचा अतिरेकी वापर, ज्यामुळे निर्माण होणारे ध्वनी आणि वायू प्रदूषण आज आपल्या समाजासाठी चिंतेचा विषय बनला आहे. दिवाळी, नाताळ, नवीन वर्ष, लग्नसोहळे, क्रिकेटमधील विजय किंवा राजकीय कार्यक्रम अशाप्रकारचा कोणताही प्रसंग असो, फटाक्यांच्या आवाजाशिवाय तो अपूर्ण वाटतो. परंतु या काही क्षणांच्या आनंदामागे दडलेले प्रदूषणाचे सत्य आपण वारंवार विसरतो.

फटाक्यांचे उत्पादन हे रासायनिक पदार्थांच्या जटिल मिश्रणावर आधारित असते. पोटॅशियम नायट्रेट, सल्फर, कोळशाची भुकटी, बॅरियम, मॅग्नेशियम, लीड, आर्सेनिक, अॅल्युमिनियम, स्ट्रॉन्शियम यांसारख्या अनेक धातू आणि रासायनिक घटकांचा वापर त्यात केला जातो. हे पदार्थ जळताना हवेमध्ये नायट्रोजन ऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड, कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनोऑक्साइड आणि सूक्ष्म धूलिकण सोडतात. या प्रदूषक वायूंमुळे वातावरणातील हवा विषारी बनते. विशेषतः झच२.५ आणि झच१० या सूक्ष्मकणांचे प्रमाण फटाक्यांच्या दहनावेळी अनेक पट वाढते. (झच२.५ म्हणजे अतिशय बारीक, आणि झच१० म्हणजे थोडे मोठे कण) हे सूक्ष्मकण इतके लहान असतात की ते थेट फुफ्फुसांमध्ये जाऊन रक्तप्रवाहात मिसळतात, ज्यामुळे श्वसनाचे आजार, दमा, ब्रॉन्कायटिस, फुफ्फुसाचे संक्रमण आणि हृदयविकारांची जोखीम वाढते.प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार, भारतातील प्रमुख शहरांमध्ये दिवाळीनंतर हवेमधील प्रदूषणाची पातळी नेहमीपेक्षा चार ते पाच पट वाढते. दिल्ली, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये दिवाळीच्या रात्रीनंतर झच२.५ च्या प्रमाणात अत्यंत झपाट्याने वाढ होते. दिल्लीमध्ये तर -टख (-ळी टींरश्रळीूं खपवशु) गंभीर या श्रेणीत म्हणजे ४००-५०० पर्यंत पोहोचतो. ही परिस्थिती श्वसनास त्रास देणारी आणि जीवघेणी ठरू शकते. हवेमध्ये सल्फर डायऑक्साइड व नायट्रोजन ऑक्साइडचे प्रमाण वाढल्यामुळे डोळ्यांत जळजळ, घसा खवखवणे, डोकेदुखी, थकवा आणि श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे सामान्यपणे दिसून येतात.फटाक्यांच्या दहनामुळे केवळ वायू प्रदूषणच नाही, तर ध्वनी प्रदूषणही प्रचंड प्रमाणात वाढते. साधारण मानवी कानाला सुरक्षित ध्वनीमर्यादा ७५ डेसिबेल इतकी असते, परंतु फटाक्यांच्या स्फोटावेळी आवाजाची तीव्रता १२० ते १५० डेसिबेलपर्यंत पोहोचते. अशा तीव्र आवाजामुळे कानातील श्रवणशक्तीवर परिणाम होतो, झोपेच्या गुणवत्तेत घट येते, रक्तदाब वाढतो आणि मानसिक ताण निर्माण होतो. वृद्ध व्यक्ती, लहान मुले आणि रुग्ण यांच्यासाठी हा आवाज विशेषतः त्रासदायक असतो. पक्षी, प्राणी यांनाही ध्वनी प्रदूषणाचा मोठा फटका बसतो. अनेक पक्षी दिशाभूल होऊन झाडांवरून पडतात, पाळीव प्राण्यांमध्ये भीती आणि अस्वस्थता निर्माण होते, तर वन्यजीवांमध्ये प्रजननाच्या प्रक्रियेवर परिणाम होतो.

फटाक्यांचा परिणाम फक्त हवेमध्येच मर्यादित राहत नाही. त्यांचे अवशेष म्हणजे कागदाचे तुकडे, धातूंचे कण, प्लास्टिकचे कवच आणि राख जमिनीवर साचतात. हे सर्व नाल्यांत, पाण्याच्या स्रोतांत आणि शेतीच्या जमिनीत मिसळून जमिनीचे आणि जलस्रोतांचे प्रदूषण निर्माण करतात. जड धातूंचे हे अवशेष जमिनीतील पोषक घटकांची हानी करतात, त्यामुळे पीक उत्पादनावरही परिणाम होतो. नद्या आणि तलावांमध्ये मिसळलेले हे रसायन जलीय जीवसृष्टीसाठी घातक ठरते.

फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही, तर तो सामाजिक आणि आर्थिक प्रश्नही आहे. दरवर्षी फटाके फोडताना शेकडो अपघात होतात. मुलांच्या आणि तरुणांच्या हातांना, चेहऱ्यांना व डोळ्यांना गंभीर दुखापती होतात. अनेकांना आयुष्यभरासाठी अपंगत्व येते. या दुर्घटनांमुळे रुग्णालयांवरील भार वाढतो आणि कुटुंबांवर मानसिक तसेच आर्थिक ओझे येते. प्रदूषणामुळे वाढणाऱ्या आजारांमुळे आरोग्यखर्च वाढतो, कामकाजातील उत्पादकता कमी होते आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचा नकारात्मक परिणाम होतो.

भारतामध्ये 'वायू प्रदूषण प्रतिबंधक कायदा, १९८१', 'पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६' आणि 'ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियम, २०००' यांद्वारे फटाक्यांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न केले गेले आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही दिवाळीच्या काळात केवळ ग्रीन फटाके वापरण्याची शिफारस केली आहे. हे ग्रीन फटाके पारंपरिक फटाक्यांपेक्षा सुमारे ३० टक्के कमी प्रदूषण निर्माण करतात. तसेच रात्री १० नंतर फटाके फोडण्यास बंदी घालण्यात आली आहे. तथापि, या नियमांचे पालन नागरिकांनी मनापासून केले नाही, तर कायदे कागदावरच राहतील.यावर उपाय म्हणून जनजागृती आणि जबाबदार वर्तन अत्यंत आवश्यक आहे. सण साजरे करणे हे आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे, पण सण साजरा करताना निसर्गाचा अपमान न करता, पर्यावरणपूरक पद्धती अवलंबणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आपण सणाचा आनंद फटाक्यांशिवायही साजरा करू शकतो. पारंपरिक दिवे, एलईडी लाइट्स, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि पर्यावरण रक्षणाचे संकल्प यांद्वारे. शाळा-कॉलेजांतून विद्यार्थ्यांना फटाक्यांच्या दुष्परिणामांबद्दल शिक्षित केले पाहिजे. माध्यमांनीही याबाबत जबाबदार भूमिका घेत जनतेला जागरूक करणे आवश्यक आहे.आजचा काळ हा हवामान बदलाचा आणि पर्यावरणीय संकटांचा काळ आहे. पृथ्वीचे तापमान वाढत आहे, पर्जन्यमानात अनिश्चितता वाढली आहे, आणि शुद्ध हवा हे आता लक्झरीसारखे झाले आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

# देवगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज अश्वरूढ मूर्ती अभिषेक सोहळ्याचा उत्सव थाटात पार

**आत्ताच एक्सप्रेस**

**बदनापूर/प्रतिनिधी**/शौर्य, पराक्रम आणि स्वराज्याचे जिवंत प्रतीक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ मूर्तीच्या अभिषेक सोहळ्याने देवगाव (ता. बदनापूर) गावात इतिहास जागा केला. दणदणाट, ढोलताशे, लेझीम, जयघोष आणि भगव्या पताकांच्या लहरींनी गावभर दैदिप्यमान वातावरण निर्माण झाले. या भव्य सोहळ्याचे उद्घाटन मा. श्री. नारायण भाऊ कुचे (आमदार, बदनापूर विधानसभा मतदारसंघ) यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडले.

सकाळीच जय भवानी, जय शिवराय या घोषणांनी वातावरण दुमदुमले. शिवभक्त, महिला, युवक आणि बालमित्रांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण गावात उत्सवाचे रंग भरले. पारंपरिक पोशाखातील तरुण, भगवा झेंडा फडकवत घेतलेली मिरवणूक पाहण्यासाठी गावकरी रस्त्यावर ओसंडून वाहत होते. प्रत्येकाच्या डोळ्यांत महाराजांबद्दलचा अभिमान आणि भक्ती झळकत होती.

या ऐतिहासिक सोहळ्यास धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. ह.भ.प.श्री पंढरीनाथ महाराज तावरे नाना (सं.वा.से. सं वाकुळणी), ह.भ.प.श्री नामदेव महाराज शिंदे (देवमुनेश्वर संस्थान वहेगाव देमणी), ह.भ.प.श्री शिवाजी महाराज शिंदे (दरकवाडीकर) यांच्यासह विविध संत, मान्यवर आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.

विशेष उल्लेखनीय म्हणजे या कार्यक्रमात मुस्लिम मावळ्यांचा सहभाग. हिंदवी स्वराज्याच्या धर्मनिरपेक्ष आणि ऐक्याच्या विचारांना वंदन म्हणून मुस्लिम मावळे मोठ्या संख्येने सहभागी झाले. त्यांच्या उपस्थितीने शिवाजी महाराज हे सर्व धर्मांचा



सन्मान करणारे राजे होते हा संदेश अधिक दृढ झाला. या दृश्याने खरी शिवभक्ती आणि एकतेचे दर्शन घडवले.

समारंभात आमदार नारायण भाऊ कुचे यांनी आपल्या प्रभावी भाषणातून सांगितले की छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एका धर्माचे नव्हे, तर सर्व धर्मांचा सन्मान करणारे, सर्व समाजांच्या कल्याणासाठी लढणारे लोकनायक होते. त्यांच्या विचारांतूनच खरी राष्ट्रभक्ती, प्रामाणिक सेवा आणि लोकहिताची प्रेरणा मिळते.

या कार्यक्रमाचे आयोजन श्री शिवप्रतिष्ठान देवगाव (ता. बदनापूर) यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अखेरीस सरपंच विनोद मगरे, रवी मगरे, कमलाकर कोल्हे, भास्कर कोल्हे, शिवाजी कोल्हे, गणेश कोल्हे, सुदाम कोल्हे, ज्ञानेश्वर कोल्हे, लक्ष्मण भुसारे, आत्माराम भालेकर, भगवान कोल्हे, सुरेश कोल्हे, शंकर घुगरे , बाळू घोगरे आणि सर्व ग्रामस्थांनी महाराजांना अभिवादन करून एकतेचा संकल्प घेतला.या अभूतपूर्व सोहळ्याने देवगावात शिवभक्तीची ज्योत पुन्हा प्रज्वलित झाली असून, स्वराज्याचा अभिमान आणि ऐक्याचा संदेश प्रत्येकाच्या मनात रुजला आहे.

# चांगल्या संस्कारासाठी चांगले विचार व चांगला स्वभाव आवश्यक?

स्वभाव....... स्वभाव जर चांगला असेल तर दूरची मंडळीही जवळ येतात. अन् स्वभाव जर वाईट असेल तर जवळची मंडळीही दूर जातात. उदाहरण द्यायचं झाल्यास रावणाचं देता येईल. रावणाचा स्वभाव हा वाईट असल्याचं जाहीर असल्यानं त्याचा सख्खा भाऊ त्याचेपासून दूर गेला तर रामाचा स्वभाव चांगला असल्यानं त्याचा सख्खा भाऊ लक्ष्मणही त्याच्या जवळ राहिला. म्हणूनच स्वभाव हा अतिशय महत्वपुर्ण आहे.माणसाचा स्वभाव हा महत्वाचा आहे. तसंच महत्वाचं आहे त्याचं कार्य. कार्य जर चांगले असतील तर चार माणसं जुळत जातात. जसं रामासोबत घडलं. रामाचे कार्य चांगलं असल्यानं रामासोबत अनेक माणसं जुळत गेली.माणसाचा स्वभाव हा विचार व कार्यावरुन घडत असतो. चांगले कार्य घडण्यासाठी चांगले विचारही मनुष्यात असणे तेवढेच गरजेचे आहे. वाईट विचार जर असतील तर उत्कृष्ट कार्य घडणारच नाही. म्हणजेच ज्याप्रमाणे चांगले कार्य महत्वाचे आहे. तसेच महत्वाचे आहे चांगले विचारही. परंतु अलिकडील काळात असे चांगले विचार व चांगले कार्य आपल्याला पाहायला मिळत नाही.अलिकडील काळात गुंडगीरी व गुंडेगीरीनामक विचार सगळीकडे पाहायला मिळतात. संस्काराला जणू तिलांजलीच मिळालेली दिसते. लहान लहान शाळेत शिकणारी मुलं ही मार दूँगा, काँट दूँगा ची भाषा बोलत असतात. त्यातच हातात काठ्या घेवून तशी कृतीही करुन दाखवत असतात. शिवाय अभ्यास करा म्हटलं तर बारा गाडे बोंब असते. त्यावर हे कुठून शिकलाय असे विचारले असता ते मौन बाळगून असतात. हीच मुलं पुढं वात्रट स्वभावाची निघतात.

अलिकडील काळात मोठ्या माणसांच्या स्वभावाबाबत विचार केल्यास सगळीकडे भ्रष्टाचार दिसतो. कोणी सरकारी कार्यालयात नोकरी करुन भ्रष्टाचार करतो. कोणी नोकरी लावून देतो असे आमीष दाखवून भ्रष्टाचार करतो. कोणी आपली कामं लवकर करुन घेण्यासाठी भ्रष्टाचार करतो. हा झाला भ्रष्टाचाराचा भाग. कोणी बलात्कार करुन आपली हौस भागवत असतात. ज्यातून महिला सुखी दिसत नाही व तिला रात्री, अपरात्री कामानिमित्त बाहेरही पडता येत नाही. कोणी दिन दहाडे खुन करायलाही मागे पाहात नाहीत. तेही किरकोळ गोष्टीवरुन. इथं आपल्या जन्मदात्या बापाचे मुडदे पाडले जातात. वासनेसाठी स्वतःची बहिण वा लेक ओळखता येत नाही अन् मुलगा वात्रट निघाला म्हणून खुद्द आईवडील आपल्या मुलांची हत्या करतो. एवढंच नाही तर आपली कामवासना भागावी म्हणून काही महिलाही आपल्या पती आणि मुलांची हत्या करीत असते.

काही तर स्रिया अशा आहेत की ज्या विवाह अगदी थाटामाटात करतात. त्यातच त्या स्रियांना कोणीही बंधनात ठेवलेलं आवडत नाही. अशा स्रिया विवाह झाल्यानंतर ताबडतोब दोन तीन महिन्यात फारकत घेतात. त्यातच खटले दाखल करतात. मग खावटी मागतात वा खावटी म्हणून समूळ रक्कम मागतात व एकट्याच मायबापाच्या घरी आनंदाने खात बसतात.

एकंदरीत समाजातील वास्तविकतेचा विचार केल्यास आज देशातील लोकांची परिस्थिती व विचारही चिघळलेले आहेत की ज्यातून कोणाला कोणावर विश्वास ठेवता येत नाही. आज यावर खऱ्या अर्थानं विचारमंथनाची गरज आहे. संस्काराची उणीव जाणवत असून आजच्या काळात संस्कार हे तुटत चालले आहेत. असे जाणवायला लागलेले आहे.असे का झाले? असे का होत आहे? याबाबत विचार केल्यास व अभ्यास केल्यास विद्यार्थ्यांच्या बालस्तरावर जावे लागेल. विद्यार्थ्यांच्या बालस्तरावरचा विचार केल्यास विद्यार्थ्यांच्या बालवयात विद्यार्थ्यांवर संस्कार होतांना चांगले संस्कार होत नाहीत. ज्यातून वाईट संस्कार विद्यार्थ्यात वाढीस लागतात. जे संस्कार घरातूनच होत असतात. जे संस्कार परीसरातून होत असतात. जे संस्कार शाळेमधूनही होत असतात. हे तिन्ही स्थळ विद्यार्थ्यांना चांगले संस्कार देतील तरच चांगले संस्कार मुलांवर होतील. जे चांगले संस्कार मुलांमध्ये टिकून राहून त्याला भविष्यात आदर्श बनविण्यात कारणीभूत ठरु शकतील.

मुलांमध्ये सर्वप्रथम संस्कार पेरणारे घटक असते त्याचं घर. घरात त्याच्या आईवडिलांचं बोलणं, वागणं चांगलं असायला हवं. ते कुटुंब त्यांच्या आजी आजोबांची वा म्हातारे, अपंग, अनाथांची सेवा करणारे हवे. त्यातच त्या कुटुंबातील सदस्यांना कोणत्याच प्रकारची व्यसनं नसायला हवीत. परंतु आजची परिस्थिती अशी आहे की प्रत्येक घरातच मी माझी मुलं व माझी पत्नी. एवढंच विश्व आहे व म्हातारी मंडळी ही वृद्धाश्रमात असतात. तिथं निरनिराळी व्यसनं असून खुद्द वडील आपल्या मुलांना खर्रे आणायला पाठवतात नव्हे तर दारुची बाटलही घरातून आणायला पाठवतात. एवढंच नाही तर मुलांसमोरच दारु पितात. यात आईही मागे नाही. तिही आपली फॅशन करुन तोकड्या कपड्यात मिरवीत असते. पती कामावर गेल्यावर व्याभिचार करीत असते. शिवाय घरात मुलांच्या समोरच आईवडीलांच्या बोलण्याची भाषा वात्रट निघते. वागणं वात्रटच स्वरुपाचं असते. त्यातच सतत काही ना काही कारणानं भांडणं होतच असतात. या सर्व गोष्टीत गुंफलेले आईवडील. त्यांचं बाळाकडं लक्षच नसतं. त्यातच आजच्या महागाईच्था काळात पती पत्नी दोघंही कामाला जातात, मुलांना बेवारस ठेवून. ज्यातून मुलांवर संस्कार होतांना अडचणी निर्माण होतात. हेच पाहतात मुलं व त्याचेवर याच गोष्टीतून बरेवाईट संस्कार होत असतात. दुसरा संस्कार हा परिसरातून होतो. परिसरातून संस्कार होतांना मुलं आपल्या मित्रांसोबत रमतात. ती जशी वागत असतील, बोलत असतील, तशीच वागतात, बोलतात. ज्यातून मुलं ही वाईट स्वरुपाची घडू शकतात. त्यातच तिसरा मुलांच्या संस्कारावर परिणाम करणारा घटक आहे शिक्षक. मुलं जेव्हा शाळेत येतात. अशावेळेस त्यांचं चांगलं वाईट वर्तन घडतं. अशावेळेस चांगल्या वर्तनाला चांगलं व वाईट वर्तनाला वाईट म्हणण्याची पात्रता ही शिक्षकात असावी. शिक्षकात संस्कार फुलविणारा गुण असावा व त्यांना चांगले, वाईट हे अतिशय उत्कृष्टपणे मुलांना समजावता यावे. ज्यातून चांगले संस्कार होतील. तसाच स्वतः शिक्षक हा संस्कारी असायला हवा. परंतु अलिकडील काळात शिक्षकही विद्यार्थ्यांप्रती स्वार्थी दृष्टिकोन ठेवतात. तसं पाहिल्यास त्यांच्यातच संस्कार नसतो. मग ते मुलांवर संस्कार कुठून करतील? अशावेळेस शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर संस्कार होत नाहीत.

आज संस्काराची वानवा आहे. विभक्त कुटुंबपद्धती असल्यानं लहान मुलांवर त्यांच्या आजी आजोबांमार्फत होणारे संस्कार, केले जात नाहीत. व्यसनानं परिस्थिती हलाखीची होत असल्यानं संस्कार करायला चांगल्या संस्कारी जागेवर वास्तव्य करता येत नाही. तसंच इच्छा असूनही मुलांना चांगले संस्कार करण्यासाठी चांगल्या शाळेत दाखल करता येत नाही. इथूनच संस्कार तुटत जातात. ज्यातून भविष्यात चांगल्या संस्काराला तिलांजली मिळते व हीच मुलं मोठी झाली की त्यांच्यात गुंडगीरी वाढीला लागते. ज्यात दोष त्या मुलांचा नसतो. दोष असतो, शिक्षक, पालक आणि सवंगडी यांचा.

खरं तर मुलांची ही भविष्यात निपजणारी पिढी संस्कारक्षम व्हावी. त्यासाठी मायबापानं प्रयत्न करायला हवेत. कोणत्याही आईवडीलांना आपली मुलं ही वाईट विचारांची निघायला हवी असे वाटत नाही. आजची मुलं ही आईवडीलांचं अजिबात ऐकत नाही. त्याचंही कारण आहे, आईवडीलांचं वागणं. घरात म्हातारे आजीआजोबा नसणं आणि असतीलही तर त्यांच्यावर आपल्याच आईवडीलांचं रागावणं. ज्यातून ही मुलं आजीआजोबांचं ऐकण्याऐवजी त्यांची हेळसांड करतात. ज्यातून मुलांवरील चांगल्या संस्कारावर डाग लागतो. आजची मुलं शिक्षकांचंही अजिबात ऐकत नाहीत. त्याचंही कारण आहे शिक्षकांचं वागणं व त्यांचा विद्यार्थ्यावर मुळातच धाक नसणं. छडीचा मार कायमचा दूर झाल्यानं मुलं शिक्षकांना दबत नाहीत. उलट ते शिक्षकांनाच दाबतात. तसाच परीसरही महत्वाचा आहे. मुलं परीसरातून बरंच काही शिकतात. हे जरी खरं असलं तरी महत्वाचा भाग आहे आनुवंशिकता. चांगल्या गुणांसाठी रक्तही तेवढंच चांगलं असावं लागतं. चांगल्या संस्कारी लोकांच्या पोटी चांगलीच संस्कारी मुलं जन्मास येतात की ज्यांच्यावर कितीही वाईट परिणाम होत असला, परिसर, आईवडील वा शिक्षकांचा. तरीही काहीच फरक पडत नाही. गाईच्या गर्भातून कधीच वाघ जन्माला येत नाही. भक्त प्रल्हादावर कधीच त्याच्या आईवडीलांचा, गुरुंचा व मित्रपरीवारांचा परिणाम झाला नाही.

महत्वपुर्ण बाब ही की कुत्र्याचं शेपूट कधीच सरळ होत नाही. मग ते कुठंही टाकलं तरी. तसं संस्कारांचं आहे. संस्कारही कुत्र्याच्या शेपटीगत सहज होत नाहीत. थोडासा प्रयत्न तेवढा करु शकतो आपण. ज्यातून रक्तीतील संस्काराला आपल्या प्रयत्नानं थोडीशी दिशा तरी देता येईल. चांगली पिढी निपजण्यासाठी रक्तातच चांगल्या संस्काराचा गुण असावा लागतो. तो जर असेल तर परिसर कितीही वाईट असू द्या. आईवडील कितीही वात्रट वागू द्या. शिक्षक कितीही वाईट मिळू द्या. मुलं घडणारच. हे जरी खरं असलं तरी प्रयत्न करायला काय हरकत आहे. प्रयत्न केल्यावर शेतातीलही उत्पन्न वाढवता येतं. ही तर संस्काराची गोष्ट आहे. ती सहज शक्य करता येवू शकते. चांगल्या स्वभावानं व चांगल्या विचारानं चांगल्या संस्काराची रुजवणूक करता येते.

विशेष म्हणजे आपला स्वभाव व विचार चांगले असावे की ज्या स्वभावानं व विचारानं आपल्याला वाईट संस्कारावर मात करता येईल. वाल्याचा वाल्मिक बनवता येईल. अंगुलीमालचा अहिंसक बनवता येईल. तसंच आम्रपालीलाही विशेष असा सन्मान प्राप्त करुन देता येईल. अलिकडील काळात त्यावर कोणीच विचार करीत नाहीत. कारण कुणाकडे त्यावर पुरेसा विचार करायला सवडच मिळत नाही. खरं तर याच गोष्टीवर विचारमंथन व्हावं. शिबीरं आयोजित केली जावीत. शाळेशाळेतून चांगल्या संस्काराचे उपक्रम राबविण्यात यावेत.

तसेच इमानदारीवर बक्षीस दिले जावेत आणि भ्रष्टाचार करणाऱ्याला थेट फाशीच. असं जर घडलं तर कदाचीत त्यातून परिणाम घडून चांगले संस्कार फुलवता येतील. तसेच आपले संस्कार असे असावेत की भविष्यात आपण मरण जर पावलो तर चार लोकं एकत्र येतील. प्राणी, पक्षीही आपल्या मयतीला असतील. त्यातच पाऊस, वाराही आपली उपस्थिती दाखवेल. यात तीळमात्र खोटपण नाही. तसेच आपले संस्कार जर चांगले नसतील तर कावळेही आपल्या पिंडाला शिवणार नाहीत. म्हणून कोणी कितीही वाईट असेना, आपलाही स्वभावगुण भूतकाळात वाईट का असेना, समजदारी आल्यावर आपल्यात परीवर्तन करावं. जेणेकरुन कावळाही आपल्या मयतीला येईल व आपल्या पिंडीला शिवेल. असेच आपले संस्कार असावेत. चांगले संस्कारच भविष्यात येणाऱ्या संकटांना टाळून नेतात. वाईट संस्कार भविष्यात अनेक अडचणी निर्माण करीत असतात.

**-अंकुश शिंगाडे नागपूर**

# निवडणुकीच्या तोंडावर गाजावाजा करत सुरु करण्यात आलेली 'आनंदाचा शिधा सत्तेच्या राजकारणात हरवले का?

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी** / गंगापूर तालुक्यात व परिसरातील यंदा 'आनंदाचा शिधा' गायब झाले की चर्चा आहे. आनंदाचा शिधा या योजनेतर्गत सरकारने 'गरिबांचा आनंद वाढविण्याचे' मोठमोठे दावे केले होते. मात्र प्रत्यक्षात हा आनंदाचा शिधा निवडणूक संपल्यानंतर गायब झाला आहे. त्यामुळे नागरिकांचा सरकारवरील विश्वास ढळू लागला आहे. गरिबांच्या थाळी-तला आनंद सत्तेच्या राजकारणात हरवला का? असा प्रश्न सर्वत्र विचारला जात आहे. निवडणुकीच्या तोंडावर गाजावाजा करत सुरू करण्यात आलेली 'आनंदाचा शिधा योजना' आज पूर्णपणे ठप्प झाली आहे. आनंदाच्य सरकारने गरीब आणि वंचित घटकांना दिल-ासा देण्यासाठी सुरू केलेली ही योजना काही काळ चालल्यानंतर अचानक बंद पडल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये संताप आणि संभ्रमाचे वातावरण आहे. गावागावात या शिध्याची वाट पाहणाऱ्या शेकडो कुटुंबांना आता महिनोमहिने काहीच मिळत नाही. निवडणुकीपूर्वी घरपोच दिला जाणारा हा शिधा आता गायब झाला आहे.



पण निवडणूक संपताच तो थांबला. असे एका लाभार्थी वृद्ध नागरिकाने व्यथित होऊन सांगितले.फक्त मतांसाठीच हा आनंद होता का ? लोकसभा व विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने सुरू केलेल्या पुरवठा विभागाच्या 'आनंदाचा शिधा' योजनेमुळे गोरगरिबांच्या घरात सणासुदीचा आनंद साजरा झाला होता. मात्र मागील वर्षभरापासून हा शिधा बंद असल्याने फक्त मतांसाठीच हा आनंद होता का? असा सवाल नागरिक करत आहेत. सरकारचा 'आनंदाचा शिधा' खरंच हरपला, की मुद्दाम विसरला गेला ? अशी चर्चा आता तालुक्यात रंगू लागली आहे.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, ई-निविदा सुचना

**जा.क्र./मनपा/ई- निविदा /२०२५/३३९**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**
**दिनांक:-१८.१०.२०२५**

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा भरण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | मनपाच्या दशमेशनगर उद्यानात विविध उद्यान विषयक कामे करणे. | २२.१०.२०२५ |
| २. | वार्ड क्र. ९७ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| ३. | वार्ड क्र. ७९ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| ४. | वार्ड क्रूर. ९५ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| ५. | वार्ड क्र. ७६ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| ६. | वार्ड क्र. ७८ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| ७. | वार्ड क्र. ९७ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| ८. | वार्ड क्र. १११ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| ९. | वार्ड क्र. ९३ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| १०. | टेलीकॉम हौ. सोसायटी सिडको एन-६ येथे ३०० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन नाल्यामध्ये टाकणे व नाला वेड कॉंक्रीट करणे. | २४.१०.२०२५ |
| ११. | वार्ड क्र. ६३ चिश्तीया कॉलनी येथे विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | २४.१०.२०२५ |
| १२. | वार्ड क्र. ३८ मसनतपूर अंतर्गत ३०० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | २४.१०.२०२५ |
| १३. | वार्ड क्र. ७७ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| १४. | वार्ड क्र. ९८ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| १५. | वार्ड क्र. ११३ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| १६. | वार्ड क्र. ९१ अंतर्गत जय भवानीनगर नामदेव मंदिर गल्ली मधील ड्रेनेज लाईन बदलणे. | २४.१०.२०२५ |
| १७. | वार्ड क्र. ८० अंतर्गत एन-३ मधील संतोष टी सेंटर से कोटेच्या बिझनेस हब बिल्डिंग पर्यन्त ड्रेनेज लाईन टाकणे. | २४.१०.२०२५ |
| १८. | नागरी क्रिडा केंद्र क्र. ०४ एन-३ स्केटींग बास्केटबॉल कोटे वरील भिंत दुरुस्ती करणे व इतर आवश्यक कामे करणे. | २४.१०.२०२५ |
| १९. | वार्ड क्र. ९९ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| २०. | वार्ड क्र. ११० जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| २१. | वार्ड क्र. ११२ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| २२. | वार्ड क्र. ७४ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| २३. | वार्ड क्र. ९६ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| २४. | वार्ड क्र. ९४ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| २५. | वार्ड क्र. ७५ जलनि:सारण वार्षिक पध्दतीवर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | २४.१०.२०२५ |
| २६. | झोन क्र. ९ कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ७२. क्रांतीचौक अंतर्गत मनपा शाळा (गोपाल टी च्या पाठीमागे) ते उत्सव चौक जवळील बासटवार कॉम्प्लेक्स व इतर ठिकाणी जाणारी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे व मेनहोल चेंबर बांधणे. | २४.१०.२०२५ |
| २७. | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेसाठी जलनि:सारण वाहिनी तपासणी यंत्राचा (O AND M सह) पुरवठा करणे. | २७.१०.२०२५ |
| २८. | वार्ड क्र. १०४ येथील मनपा आरोग्य केंद्र बन्सीलालनगर येथे विविध कामे करणे. | २७.१०.२०२५ |
| २९. | वॉर्ड क्र. १०३ व १०४ येथील वेदांनगर व्हॉलीबॉल कोर्ट व बन्सीलालनगर बॅटमिंटन हॉल ची दुरुस्ती करणे. | २७.१०.२०२५ |
| ३०. | वार्ड क्र. ०७ मयुरपार्क अंतर्गत मारोतीनगर हिरानगर येथील पासवान यांच्या घरापासून ते शनी मंदिर पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे. | २७.१०.२०२५ |
| ३१. | शहर पाणी पुरवठा योजना- जायकवाडी ते नक्षत्रवाडी दरम्यान विविध ठिकाणी ची Fabricated Vaccume Breaker Cum -ir Release Valve (PN 1.6) चा पुरवठा करणे व बसविणे. | २७.१०.२०२५ |
| ३२. | सिडको एन-५ पंपगृह येथे टैंकर फिलींग पॉईंटची उभारणी करणे. (एकुण ०५) | २७.१०.२०२५ |
| ३३. | वार्ड क्र. ३१ शिवनेरी कॉलनी महादेव मंदीर जवळ RCC गटर बांधणे. | २८.१०.२०२५ |

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांचे वतीने योग्यत्या वर्गातील ठेकेदारांकडून ई- निविदा मागविण्यात येत आहे. निविदेची विस्तृत माहिती संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत/-**
**सिस्टीम मॅनेजर (ई-निविदा)**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**




# समाजातील प्रत्येक वंचित व्यक्तीला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर/प्रतिनिधी**/सामाजिक न्यायाच्या दृष्टीने एक व्यापक विचार आम्ही बाळगला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून शेवटच्या घटकातील माणसाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी जी दूरदृष्टी बाळग-ली ती प्रत्यक्षात आम्ही समाजातील विविध घटकांना प्रत्ययास देत आहोत. त्यांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक विकासासाठी आम्ही कटिबद्ध असून सामाजिक न्याय विभागाचा हा विविध योजनांतर्गत लाभार्थ्यांना थेट लाभ पोहचविण्याचा उपक्रम याचेच द्योतक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



दिवंगत ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक न्याय विभागाच्या समारंभात ते बोलत होते. प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा यादृष्टीने ई-रिक्षा व इतर वैयक्तिक लाभ योजना वाटप समारंभास महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, गृहनिर्माण तथा इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, वित्त राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, सर्वश्री आमदार कृपाल तुमाने, परिणय फुके, डॉ. आशिष देशमुख, मोहन मते, चरणसिंग ठाकुर, संजय मेश्राम, राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, मनपा आयुक्त अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, सामाजिक न्याय विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वंचित घटकांना स्वंयरोजगाराची साधने मिळण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून शासन प्रयत्नरत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आपण महिलांनाही मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नांची शर्त केली आहे. राज्यात आपण २५ लाख दीदींना लखपती केले आहे. आजच्या घडीला राज्यात सुमारे ५० लाख दीदी आता लखपती दीदी झाल्या आहेत. लवकरच १ कोटी दीदींना लखपती करण्याचा संकल्प आपण पूर्ण करू असा, विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यातील मांग-गारुडी व इतर वंचित घटकातील व्यक्तींना विकासाच्या प्रवाहात घेण्यासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्येक वाडी वस्तीवर जाऊन शासनाचे विशेष कॅम्प लावले. यातून या समाजाला त्यांच्या हक्काचे ओळखपत्र मिळाले. यामुळे रमाई आवास सारख्या योजना प्रभावीपणे त्यांच्यापर्यंत पाहचविणे आता सहज शक्य झाल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्याचा गौरव केला.

जिल्ह्यातील प्रत्येक आदिवासी व्यक्तीला ऊर्जा दाता करण्याची नाविन्यपूर्ण योजना राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल यांनी मांडली. यानुसार नाविन्यपूर्ण योजनेतून प्रत्येक आदिवासी घरावर सौरऊर्जा देण्याचे नियोजन झाले. या योजनेतील उपयोगीता लक्षात घेवून लवकरच अनुसूचित जाती व इतर मागासवर्ग घटकातील उपेक्षित लोकांनाही या योजनेचा लाभ पोहचू असे, सुतोवाच त्यांनी केले.

जिल्ह्यातील १ हजार महिला बचत गटांना व्यवसायासाठी प्रतीगट १ लाख रूपयांचा निधी - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

स्वयंरोजगाराच्या दृष्टीने अधिकाअधिक महिलांना आपल्या व्यवसायाला आकार देता यावा, त्यांच्या व्यावसायीक कल्पना प्रत्यक्ष साकारण्यासाठी जिल्ह्यातील १ हजार महिला बचत गटांना प्रती गट १ लाख रूपयांचा निधी लवकरच उपलब्ध करून देऊ असे, प्रतिपादन महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. प्रधानमंत्री खनिज कल्याण योजनेंतर्गत सुमारे २० कोटी रूपयांचा निधी सामाजिक न्यायासाठी, वंचित घटकातील लोकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून आपण उपयोगात घेतला आहे. जिल्हा परिषद अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकूल योजनानांही आपण अधिक गती देऊ असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा परिषदेंतर्गत जिल्ह्या-तील प्रत्येक अंगणवाडी आपण कल्पक करणार आहोत. प्रत्येक गावापातळीवर शासनाच्या विविध विकास योजना प्रभावीपणे व पारदर्शकपणे पोहचाव्यात यासाठी जिल्हा परिषद प्रयत्नशील आहे. जिल्ह्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र आता जिल्हा परिषदेच्या मुख्यालयाला जोडण्यासाठी एक परीपूर्ण वॉररूम साकारली जात असून याद्वारे आरोग्याच्या अधिक परिणामकारक सुविधा पोहोचवील्या जाणार असल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

यावेळी वित्त राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल यांनी लवकरच दिव्यांग बांधवांनसाठी अधिक प्रभावीपणे शासकीय योजनांचा लाभ दिला जाणार असल्याचे सांगितले. यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद केली असून प्रत्येक जिल्हा वार्षिक योजने-तून यासाठी ठराविक रक्कम देण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करू, असे सांगितले.यावेळी जिल्हा माहिती कार्यालयाने निर्मिती केलेल्या रमाई घरकुल योजनेच्या लघुपटाचे याचबरोबर 'स्वप्न ते सत्य' कॉफी टेबल बुकचे अनावरण करण्यात आले. कामठी तालुक्यातील वारेगाव शाळेतील ॲडव्हेंचर पार्कचे दुरदृश्य प्रणा-लीद्वारे उद्घाटन या समारंभात करण्यात आले. कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण योजनेंतर्गत प्रातिनिधीक स्वरूपात ६ लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शेत जमिनीचे कागदपत्र वाटप करण्यात आले. एकूण ४९ एकर २३ लाभार्थ्यांना देण्यात आली. घर घर संविधान अंतर्गत प्रातिनिधीक स्वरूपात वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रस्ताविका देण्यात आल्या. जिल्हा परिषद, नागपूर व महानगरपालिका, नागपूर अंतर्गत आशा व अंगणवाडी सेविकांना सायकलींचे वितरण करण्यात आले.

# गटविकास अधिकाऱ्यांची जरंडीला भेट;-जरंडी ग्रामपंचायतीचा कायापालट

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव/विजय पगारे**/ तालुक्यातील जरंडी येथे 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज' अभियानांतर्गत सुरू असलेल्या पहिल्या टप्प्यातील विकासकामांच्या पाहणीसाठी गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड यांनी शुक्रवारी दुपारी दोन वाजता जरंडी येथे भेट दिली.

या अभियानामुळे ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावून त्यांच्या जगण्यास शांतता आणि स्थैर्य प्राप्त व्हावे, असे प्रतिपादन त्यांनी या भेटीदरम्यान केले.

सरपंच स्वाती पाटील, उपसरपंच संजय पाटील, सदस्य मधुकर पाटील,दिलीप पाटील,वंदना ताई पाटील,संजीवन सोनवने यांनी यमूलवाड यांचे स्वागत केले. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी सुन-ील मंगरुळे यांनी पूर्ण झालेल्या, सुरू असलेल्या व अपूर्ण कामांची सविस्तर माहिती दिली.ग्रामपंचायत च्या वतीने गावात झालेल्या विविध कामांचा आढावा सादर केला.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत कार्यालयाची नवीन इमारत, व्यायामशाळा,प्राथमिक आरोग्य केंद्र, हुतात्मा स्मारक, स्मशानभूमीत झालेले वृक्षारोपण, अंगणवाडी, सुसज्ज अभ्यासिका, आणि सार्वजनिक वाचनालय यांचीही पाहणी केली. श्रमदानात सहभागी होत त्यांनी महिलांसोबत प्रत्यक्ष श्रमदान करून ग्रामस्थांचे कौतुक मिळविले. यानंतर प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात आयोजित चर्चासत्रात स्थानिक नागरिकांशी संवाद साधत अभियानातील अडचणींबाबत समाधानकारक उत्तरे दिली. ग्रामपंचायतींनी कर वसुली वेळेत पूर्ण करावी, घरकुलांची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत तसेच गावात प्लास्टिक वापरावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात यावा, असे आ-वाहन त्यांनी केले.

तालुक्यात जरंडी ग्रामपंचायतच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज कार्यक्रमांतर्गत झालेल्या पहिल्या टप्प्यातील झालेल्या कामांची पाहणी पूर्ण झाली आहे जरंडी गाव राज्यात अव्वल ठरणार असल्याचे गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड यांनी सांगितले यावेळी प्रकल्प अधिकारी सुभद्रा सैवर,सरपंच स्वाती पाटील,उपसरपंच संजय पाटील,प्रमोद रावणे,माजी पंचायत समितीचे सदस्य संजीवन सोनवणे, मधुकर सोनवणे, संतोष पाटील,सतिष बाविस्कर, अंगणवाडी सेविका आदींची उपस्थिती होती.




## संक्षिप्त

### महिला काँग्रेस अध्यक्षपदाच्या गैरव्यवहाराविरोधात अनिता भंडारीं दिल्ली येथे आमरण उपोषणाची तयारी!

आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) औरंगाबाद शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी झालेल्या निवड प्रक्रियेत झालेल्या अन्यायाविरोधात शहर काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा सौ. अनिता भंडारी यांनी संताप व्यक्त करत दिल्ली येथील काँग्रेस कार्यालय इंदिरा भवनसमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे.

भंडारी यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा अलका लांबा व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा संध्या सव्वालाखे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या महिला सदस्य नोंदणी अभियानात त्यांनी एकूण १३६९ महिला सदस्यांची नोंदणी करून दिलेले उद्दिष्ट यशस्वीरीत्या पूर्ण केले होते. मात्र, नियम व निकष धाब्यावर बसवून दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या दिपाली मिसाळ यांना शहराध्यक्षपदी नेमण्यात आले.

भंडारी यांच्या मते, या प्रक्रियेत आर्थिक देवाणघेवाण आणि अंतर्गत व्यवहाराचे घोटाळे झाले असल्याची शक्यता असून, दिपाली मिसाळ यांचे सख्खे भाऊ सचिन मिसाळ भारतीय जनता पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आहेत. मग अशा परिस्थितीत ती महिला काँग्रेसचे कार्य कसे करू शकेल? असा सवालही भंडारी यांनी उपस्थित केला आहे.













## कन्नड राष्ट्रवादी शहराध्यक्षपदी अथरभाईंची नियुक्ती

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /उदय कुलकर्णी/** राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचे आदेशाने छ.संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष आमदार सतीश चव्हाण यांचे हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करून मा.नगरसेवक अथरभाई उर्फ अजमल खॅश्र यांची कन्नड राष्ट्रवादी शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी पक्षाच्या मा.नगराध्यक्षा सौ.स्वातीताई कोल्हे,अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अहेमद अली भैय्या मेंबर,पक्षाचे निरीक्षक दिलीप पाटील बनकर,मा.आमदार व पक्षाचे नेते नितीन पाटील,मा.नगराध्यक्ष संतोष कोल्हे,योगेश कोल्हे सह पक्षाचे इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

सदर निवडी बाबत बोलतांना अथरभाई म्हणाले की,पक्षाने माझे खांद्यावर जी जबाबदारी सोपविली आहे. त्यास मी निश्चित न्याय देऊन येणाऱ्या माझे कार्यकाळात शहर व तालुक्यातील जनसामान्य नागरिकांना न्याय देणेसाठी प्रयत्न करील,व पक्षास शहर व तालुक्यात एक नंबरवर



कसे नेता येईल यासाठीही सदैव प्रयत्नशील राहील.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813